I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** रहिमतपूर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0173 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/09/2025 03:02 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 09/09/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 09/09/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 12:15 तास **Time To (वेळेपर्यंत):** 15:50 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 10/09/2025 **Time (वेळ):** 01:37 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 10/09/2025 02:20 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 05 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सुर्ली ,कोरेगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कमलाकर पांडुरंग साखरे

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बोरगाव , ता कोरेगाव , रहिमतपूर, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | बोरगाव , ता कोरेगाव , रहिमतपूर, सातारा, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9881991848

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | रणजित अर्जुन घाटेराव | | वडील चे नाव : अर्जुन घाटेराव | 1. Town/Village (शहर / गाव): श्री अर्पाटमेंट,फ्लट नंबर 1,Tehsil (तहसील): सातारा,Police Station (पोलीस ठाणे): रहिमतपूर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 2 नोटा | 1,000.00 |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 1,000.00

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 10/09/2025

मी कमलाकर पांडुरंग साखरे वय 45 वर्षे, व्यवसाय शेती, रा. बोरगाव ता.कोरेगाव जि.सातारा मोनं - 9881991848

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियासमवेत वास्तव्यास असुन माझे शिक्षण 12 वी पर्यंत झाले आहे. मी

बोरगाव ता.कोरेगाव येथे शेती व्यवसाय करतो.

मी दिनांक 09/09/2025 रोजी सकाळी 10.48 वा. अॅन्टी करप्शन ब्युरो, सातारा कार्यालयातील पोलीस निरीक्षक सुनिल पाटील साहेब यांना फोन करुन मौजे बोरगाव ता.कोरेगाव जि. सातारा येथील तलाठी रणजित घाटेराव हे माझ्या बहीणीचे केलेल्या हक्कसोड पत्राची सातबारा उताऱ्यावर नोंद करणेसाठी माझ्याकडे 1,000/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबतची थोडक्यात तक्रार सांगीतली व माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती केली.

त्यानुसार दिनांक 09/09/2025 रोजी माझ्या तक्रारीवरून पोलीस निरीक्षक पाटील हे दोन शासकीय पंच व सापळा पथकासह बोरगाव ता.कोरेगाव येथील आरफळ कॅनॉल शेजारील रोडवर 12.15 वा. चे सुमारास बोलेरो क्र.MH11DH8213 मधुन हजर झाले. तेव्हा पोलीस निरीक्षक पाटील यांनी माझी ओळख करून घेवून त्यांचे सह असणाऱ्या पंच 1) मन्सुर आलम मुलाणी, आरोग्य सहायक, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, सातारा 2) प्रविण विलास देशमुखे, आरोग्य सेवक, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, सातारा या दोन पंचांची व सापळा पथकातील पोहवा राजपुरे,गोगावले, पोशि थोरात, शिंदे यांची एकमेकांना ओळख करून दिली. पोलीस निरीक्षक पाटील यांनी मला माझे तक्रारीबाबत विचारणा केली असता मी त्यांना तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणचा कायमचा रहिवाशी असून त्याठिकाणी मी व माझा भाऊ असे एकत्रीत कुटुंबासह राहत आहे. माझे शिक्षण 12 वी पर्यंत झालेले आहे. आमची मौजे टकले ता.कोरेगाव जि. सातारा येथे वडीलोपार्जीत शेतजमीन असून ती शेती आम्ही करीत आहे.

मौजे टकले ता.कोरेगाव जि. सातारा येथील गट नंबर 100 मधील क्षेत्र 90 गुंठे शेतजमीन माझे वडील पांडुरंग शंकर साखरे यांचे नावावर होती. दिनांक 23/12/2021 रोजी माझ्या वडीलांचे निधन झाल्यानंतर माझा भाऊ नितीन पांडुरंग साखरे, बहीण मनिषा सुनिल लंबे व माझ्या नावाची सदर क्षेत्राचे सातबारा वरती वारस नोंद झाली. त्यानंतर माझी बहीण मनिषा सुनिल लंबे हिने माझा भाऊ नितीन पांडुरंग साखरे व माझ्या नावे सह.दुय्यम निबंधक, सातारा क्र. 2 यांचे समोर रजिष्टर दस्त क्र. 4114/2025 दिनांक 22/07/2025 अन्वये विनामोबदला हक्कसोडपत्र करून दिलेले आहे.

दिनांक 03/09/2025 रोजी मी बोरगाव ता.कोरेगाव येथील तलाठी कार्यालय येथे हक्कसोड पत्राच्या दस्ताची नोंद होणेसाठी अर्ज घेवून गेलो होतो. त्यावेळी तेथील तलाठी रणजित घाटेराव यांनी हक्कसोडपत्राच्या दस्ताची सातबारा उताऱ्यावर नोंद घेण्यासाठी 2,000/- ची मागणी केली. तेव्हा मी त्यांना हक्कसोडपत्राची नोंद घेण्यासाठी शासकीय फी आहे का? असे विचारले असता त्यांनी मला 2,000/- रु दया मी नोंद करून देतो असे सांगितले. त्यावेळी तलाठी घाटेराव यांना 2,000/- रु दिले नाहीत तर ते माझ्या हक्कसोडपत्राच्या दस्ताची नोंद करून देणार नाहीत याची खात्री वाटल्याने मी त्यांना नाईलाजास्तव 1,000/- रु त्यावेळी रोख दिले. त्यावेळी तलाठी घाटेराव यांनी मला दोन दिवसात राहिलेले 1,000/- रुपये आणुन देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना राहिलेल्या पैशाची जुळवाजुळव करून पैसे घेवून येतो म्हणून तेथून निघून आलो. तलाठी घाटेराव हे माझ्याकडे मागणी करीत असलेले 1,000/- रुपये ही लाच असल्याची माझी खात्री झाली असून ती लाच रक्कम त्यांना देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

आज दिनांक 09/09/2025 रोजी पैशाची जुळवाजुळव झाल्यानंतर मी रणजित घाटेराव, तलाठी बोरगाव यांची तलाठी कार्यालय, बोरगाव ता.कोरेगाव येथे जावून भेट घेणार असून माझ्या

कामाबाबत चर्चा करणार आहे. भेटीमध्ये चर्चेदरम्यान त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास आपले विभागामार्फत त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती. तलाठी रणजित घाटेराव यांचेत व माझेत कोणताही आर्थिक व्यवहार नाही अगर पुर्ववैमनस्य नाही.
वगैरे मजकुराची माझे सहीची हस्ताक्षरातील तक्रार पोलीस निरीक्षक पाटील यांना दिली असता त्यांनी व पंचांनी ती वाचुन बघितली व त्यावर सह्या केल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक पाटील यांनी तलाठी रणजित घाटेराव यांचेकडे पडताळणी कामी पाठविण्याचा पंचांसमक्ष निर्णय घेतला. पंच नंबर 1 म्हणुन मन्सुर मुलाणी व पंच नंबर 2 म्हणुन प्रविण देशमुखे यांनी काम करण्याचे ठरविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी मला माझेकडे लाच मागणी होत आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरवुन पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. तसेच मला व पंचाना व्हॉईस रेकॉर्डरची माहीती देवुन पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या त्यानंतर 12.52 वाचे सुमारास व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन माझे व पंचाचे निवेदन घेवुन माझे शर्टचे आतील बनियानला पीनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर लावून दिले व आरफळ कॅनॉल येथुन पंच नंबर 1 मन्सुर मुलाणी यांचेसोबत माझ्याकडील हिरो स्प्लेंडर दुचाकी वाहन क्रमांक एम एच 11 ए ए. 6567 वरुन रणजित घाटेराव तलाठी बोरगाव यांची तलाठी कार्यालय बोरगाव येथे भेट घेण्याकरिता रवाना केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक सुनिल पाटील व त्यांचे सहकारी तसेच पंच नंबर 2 असे आरफळ कॅनॉल येथे थांबून राहिले.
मी व पंच नंबर 1 मन्सुर मुलाणी यांचे सोबत तलाठी कार्यालय बोरगाव येथे गेलो असता तेथे माझी व तलाठी रणजित घाटेराव यांची समक्ष भेट झाली त्यावेळी तलाठी कार्यालय बोरगाव येथे गावातील इतर लोक बसले होते त्यावेळी तलाठी घाटेराव हे गावातील इतर लोकांसोबत त्यांचे कामासंबंधाने चर्चा करत होते. त्यामुळे मी व पंच नंबर 1 थोडा वेळ थांबुन राहीलो तेव्हा थोडया वेळाने तलाठी घाटेराव यांनी मला तुमच काय नाव हेच नाय दिलं " असे विचारले तेव्हा मी त्यांना "कोणाच माझं का कमलाकर पांडूरंग साखरे" असे सांगीतले त्यावर तलाठी घाटेराव यांनी माझ्यापुढे एक कागद देवुन "इथ सही करा" असे सांगीतले त्यावेळी सदर कागदावर मी सही केली. त्यावेळी मी तलाठी घाटेराव यांना "तुमच आडनाव घाटगेराव की घाटेराव" असे विचारले असता त्यांनी मला त्यांचे आडनाव "घाटेराव" असे सांगीतले. त्यानंतर तलाठी घाटेराव हे त्यांचे समोर बसलेल्या लोकांसोबत कामाबाबत चर्चा करु लागले तेव्हा मी पंच नंबर 1 यांचेसह तेथेच थांबुन राहीलो. त्यानंतर मी तलाठी घाटेराव यांना ""माझ ते मल्चर मंजुर झालेलं आहे काय नीट करत नाय म्हणुन केला कॅन्सल, आण्णासाहेब झाल का हक्कसोडपत्राच" असे विचारले असता त्यांनी मला "टाकल की" असे सांगीतले तेव्हा मी त्यांना "टाकली ना ह.. किती दिवस" असे विचारले तेव्हा त्यांनी मला " 15 दिवसं " असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना "15 दिवस लागणार.अं. . बरंच टाईम लागतयं "बरच टाइम लागतय असे म्हणालो तेव्हा त्यांनी मला "21 दिवसात मंजुर होणार 15 दिवसात तुम्हाला दिसणार पण 21 दिवसांत "मंजुर" असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना "ते दस्त समजा लवकर नोंद नाय झाला तर ते कॅन्सल बिनसल होत नाय ना दस्त नाय तर ते डबल झाल की," असे विचारले तेव्हा त्यांनी मला "दहा वर्षानी नोंदवू शकता असे सांगीतले. त्यानंतर पुन्हा ते त्यांचे समोरील लोकांसोबत चर्चा करत बसले. थोडा वेळ थांबुन मी तलाठी घाटेराव यांना "जाऊ का आण्णासाहेब कधी येईल मग नोंद होऊन" असे विचारले तेव्हा त्यांनी मला "ती राहिलेल देवुन टाका की" असे सांगीतले. तेव्हा

मी “राहिलेले पण दयाच ’व्हय” असे विचारले तेव्हा त्यांनी “"मग काय आता ते” असे मला सांगीतले. तेव्हा मी तलाठी घाटेराव यांना “किती एक एक राहिलेय काय कमी जास्त करा की काय” असे विचारले तेव्हा त्यांनी मला “आव तुमाला लय कमी सांगितल त्यांना विचारा आदी” असे सांगीतले. व “ती परत साहेबांनी म्हणाव दाखवल नाय” असे म्हणाले तेव्हा मी त्यांना वर पण दयायला लागत का असे विचारले तेव्हा त्यांनी मला हा मग काय माझ्यापाशी काय हाय तवा असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना मी म्हणल त्यात तुमच हाय म्हणुन म्हणल काय त्यात पाचशे एक कमी झाल असत असे विचारले तेव्हा त्यांनी मला मग मी कशाला एवढ मागीतल असत असे सांगीतले तेव्हा मी “बरोबर हाय” असे म्हणालो तेव्हा तलाठी घाटेराव यांनी “त्यांना हजार मला हजार” असे मला सांगीतले. तेव्हा मी त्यांना “हा हा हा असा विषय हाय,आता आलो गडबडीत रानातन उदया येणार हाय का चालतय मग उदया” असे म्हणालो. तेव्हा त्यांनी मला “तुमी तेवढा विचार कराल तेवढा उशीर होतोय पुढ” असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना “हे च्या आयला आता तुमीपन निघाला नाहीतर घरण आलो असतो माघारी पण आता डायरेक्ट जाणाराय का थांबणाराय” विचारले असता त्यांनी मला “रहिमतपुरात हाय की” असे सांगीतले तेव्हा मी त्यांना “बर फोन करतो "करतो मी” असे म्हणुन पंच नंबर 1 यांचे सोबत तलाठी कार्यालय बोरगाव मधुन बाहेर आलो व माझ्या दुचाकी वाहनावरुन पुन्हा आरफळ कॅनॉल येथे 13.26 वा.चे सुमारास परत आलो.

तेव्हा पोलीस निरीक्षक पाटील यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर त्यांनी विचारलेवरून मी घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा पोनि पाटील व पंचांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करून घेतली की, तलाठी रणजित घाटेकर यांनी माझ्याकडे माझ्या बहीणीचे केलेल्या हक्कसोड पत्राची सातबारा उताऱ्यावर नोंद करणेसाठी माझ्याकडे 1,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याची व लाच रक्कम घेवुन रहिमतपुर ता.कोरेगाव जि.सातारा येथे बोलाविले असल्याची खात्री केली. लाच मागणीवेळी पंच नंबर 1 मन्सुर मुलाणी हे माझ्यासोबतच होते. त्यांनी माझी व तलाठी रणजित घाटेराव यांचेत लाचमागणीची चर्चा समक्ष ऐकली आहे.

त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी सापळा कारवाईचे नियोजन केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक पाटील यांनी मला व पंचांना अंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगीतले. त्यावेळी मी पोनि पाटील यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 1000/- हजार रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार पोलीस निरीक्षक पाटील यांनी दिले सुचनेवरून सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर कोऱ्या कागदांवर लिहून घेतले. त्यावर पंचानी व पोनि पाटील यांनी सही केली. त्यानुसार पोलीस निरीक्षक पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली. त्यामध्ये मी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या दोन्ही बाजूस पोलीस निरीक्षक पाटील यांचे सुचनेवरून पोहवा गोगावले यांनी अँथ्रासिन पावडर लावली व सदरची अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम माझ्या शर्टचे वरील डाव्या बाजूच्या खिशात ठेवून दिली व तलाठी रणजित घाटेराव यांना लाच रक्कम दिल्या नंतर डोक्यावरील टोपी डाव्या हाताने काढुन इशारा करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक पाटील यांनी मला दिल्या. त्यानंतर पोहवा गोवावले यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. तसेच पोनि पाटील यांनी सापळा कारवाई यशस्वी झालेनंतर लोकसेवकाकडुन लाचेची रक्कम जप्त करणेचे चित्रीकरण पोशि थोरात यांचे मोबाईल मध्ये करण्यात

येणार असल्याचे सांगीतले. तसेच पोलीस निरीक्षक पाटील यांनी सापळा कारवाईचे निवेदन घेतल्यानंतर तलाठी घाटेराव यांना रहिमतपुर येथे कोणत्या ठिकाणी लाच रक्कम घेवुन यायचे याबाबत विचारणा करणेसाठी फोन करण्यास सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी पंचासमक्ष मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवुन 14.13 वा. व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे व पंचाचे निवेदन घेवुन, व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टचे आतील बनियानला लावून दिले तेव्हा मी रहिमतपुर येथे कोणत्या ठिकाणी यायचे याकरीता तलाठी रणजित घाटेराव यांना माझा मोबाईल नंबर 9881991848 वरुन रणजित घाटेराव यांचा मोबाईल नंबर 8850240588 वर लाऊडस्पीकर ऑन करुन 14.18 वा. फोन केला व " हॅलो अण्णासाहेब कुठशी हाय" असे विचारले असता तलाठी घाटेराव यांनी "सुर्लीत, सुर्लीत आहे तुम्ही कुठे आहे" असे विचारले. तेव्हा मी त्यांना "सुर्लीत हाय वय मी बोरगावात हाय" असे सांगीतले तेव्हा त्यांनी मला "सुर्लीत ग्रामपंचायत पशी या" असे सांगीतले. त्यानुसार मी पंच नंबर 1 यांचे सोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन सुर्ली ता.कोरेगाव येथे रवाना झालो. आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक पाटील व पोहवा राजपुरे, पोशि थोरात, शिंदे व पंच नंबर 2 हे शासकीय वाहन क्रमांक एम एच 11 डी एच 8213 मधुन आले व ग्रामपंचायत कार्यालयाचे आसपास कोणासही संशय येणार नाही असे आडोशाला उभे राहीले. मी व पंच नंबर 1 दुचाकीवरुन उतरुन मी पंच नंबर 1 यांचे सोबत ग्रामपंचयात कार्यालय सुर्ली ता.कोरेगाव समोर गेलो तेव्हा तलाठी घाटेराव हे तेथे उपस्थित नव्हते मी माझ्या फोनवरुन पुन्हा तलाठी घाटेराव यांना फोन केला तेव्हा ते ग्रामपंचायत कार्यालय सुर्ली ता.कोरेगाव समोर आले. तेव्हा मी त्यांना "इकड कुठं राणात गेलता काय" असे विचारले तेव्हा तलाठी घाटेराव यांनी "ही काय तक्रार करतात लोक रस्ता नाय पाणी नाय" असे मला सांगीतले. त्यावेळी मी तलाठी घाटेराव व पंच नंबर 1 असे चालत सुर्ली ग्रामपंचायत शेजारी असलेल्या तलाठी कार्यालयात गेलो. तेव्हा मी त्यांना "रस्त्याच पण तुमच्याकडं असतय 'व्हय" असे विचारले व "सुर्ली गाव पण तुमच्याकडे आहे का?" असे विचारले तेव्हा त्यांनी मला "नाय ते आलतो मदत करायला त्यांना माणस लय असत्याती जाव लागतय ना" असे सांगीतले. तेव्हा मी "हु हु बरं पहिलं दोन हजार रुपये दिले ठरले आपल तुमचं असे "म्हणालो." त्यावर तलाठी घाटेराव " हं..हं... पहिले दोन हजार रुपये दिले नायत" असे म्हणाले मी त्यांना "नाय नाय दोन हजार दिल नायत दोन हजार सांगितले तुम्ही त्यातले एक हजार दिले आणि एक हजार हे ओके ना" असे म्हणालो व पंच नंबर 1 यांचेसमक्ष माझ्याकडील अंथ्रासीन पावडर लावलेली 1000/- रुपये लाच रक्कम शर्टचे डाव्या खिशातुन उजव्या हाताने काढुन लोकसेवक घाटेराव यांचेसमोर धरली असता त्यांनी सदर लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने घेवुन त्यांचे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. व मला "ओके" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "तेवढ घ्या व्यवस्थित करून बरेच दिवस झालय रखाडलय" असे म्हणालो तेव्हा तलाठी घाटेराव "या महिन्यात 25 पर्यंत तुम्हाला उतारा" असे म्हणाले. तेव्हा मी "या महिन्यात का, बर चालतय मग नाही टेन्शन जाऊ का "मी" असे म्हणालो. तेव्हा तलाठी घाटेराव यांनी मला "चालतय तुमच जरा लवकर झाल असत पण ते ऑनलाईन आल नाय" असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना "हा हा ऑनलाईनचा काय घोळ आहे आता त्यांचा मलाच कळत नाय" असे म्हणालो. त्यानंतर तलाठी घाटेराव यांनी माझ्याशी कामाबाबत चर्चा केली त्यावेळी मी त्यांना "तस किरकोळच आहे आमचं काम, हे काय मोठा दस्त नाही" असे म्हणालो. तेव्हा तलाठी घाटेराव

हे ""म्हणुनच तर मग हाय ना असुदया" असे म्हणले तेव्हा मी त्यांना "बर असून द्या चालतय" असे म्हणुन पंच नंबर 1 यांचे सोबत सुर्ली तलाठी कार्यालयाचे बाहेर आलो व माझ्या डोक्यावरील टोपी डाव्या हाताने काढुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला.

त्यावेळी तलाठी कार्यालय सुर्ली येथे आडोशास थांबलेले सापळा पथकातील पोहवा राजपुरे यांनी तलाठी घाटेराव यांना तलाठी कार्यालय सुर्ली येथे 14.42 वा चे सुमारास अटकावुन ठेवले. तेव्हा पोलीस निरीक्षक पाटील यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी तलाठी रणजित घाटेराव यांना त्यांची ओळख सांगीतली. त्यांना त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव रणजित अर्जुन घाटेराव वय 32 वर्षे, व्यवसाय नोकरी ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) सजा बोरगाव ता.कोरेगाव जि.सातारा रा. श्री अर्पाटमेंट, फ्लॅट नंबर 1, लक्ष्मीनगर,अहिरे कॉलनी, सातारा ता.जि.सातारा असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला लाच रकमेबाबत विचारणा केली तेव्हा मी त्यांना सांगीतले की तलाठी घाटेराव यांनी पडताळणी कारवाईवेळी मागणी केलेप्रमाणे 1000/- रुपये लाच रक्कम त्यांना दिली असुन त्यांनी लाच रकमेचा स्विकार करुन लाच रक्कम त्यांचे शर्टचे वरील डावे बाजुच्या खिशात ठेवली आहे. त्यावेळी पोलीस निरीक्षक पाटील यांचे सुचनेवरून पंच नंबर 2 यांनी तलाठी घाटेराव यांचे शर्टचे डाव्या बाजुच्या खिशातुन काढुन लाच रक्कम काढून स्वत:चे ताब्यात घेतली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी तलाठी कार्यालय सुर्ली ता.कोरेगाव कार्यालयाचे लाईट व दारे खिडक्या बंद करुन कृत्रीम अंधार करुन त्यामध्ये अँथ्रासीन पावडर लागलेल्या नोटांची व माझ्या हातांची, तसेच तलाठी रणजित घाटेराव यांचे हाताची व शर्टची अ‍ॅल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात निरीक्षण कारवाई केली. तेव्हा माझ्या हाताला तसेच तलाठी घाटेराव यांचे हाताला व लाच रक्कम ठेवलेल्या शर्टच्या खिशाला अंथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. सदरवेळी पोशि थोरात यांनी तलाठी घाटेराव यांचेकडुन लाच रक्कम ताब्यात घेतानाचे व्हिडीओ चित्रीकरण त्यांचे मोबाईल मध्ये केले आहे. त्यानंतर तलाठी घाटेराव यांचेकडुन माझ्या बहीणीचे हक्क सोड पत्राचे कामाबाबतची सर्व कागदपत्रे पोलीस निरीक्षक पाटील यांनी पंचासमक्ष जप्त केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात जावून करण्याचे निश्चित केले.

तरी दिनांक 09/09/2025 रोजी केले पडताळणी कारवाईवेळी लोकसेवक रणजित अर्जुन घाटेराव वय 32 वर्षे, व्यवसाय ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) सजा बोरगाव ता.कोरेगाव जि.सातारा रा. श्री अर्पाटमेंट, फ्लॅट नंबर 1, लक्ष्मीनगर,अहिरे कॉलनी, सातारा ता.जि.सातारा यांनी तक्रारदार यांचेकडे बहीणीचे हक्कसोड पत्राची सातबारा उताऱ्यावर नोंद घेण्यासाठी तलाठी कार्यालय बोरगाव ता.कोरेगाव जि.सातारा येथे 1000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच दिनांक 09/09/2025 रोजी 14.40 वा चे सुमारास सापळा कारवाईवेळी लोकसेवक रणजित अर्जुन घाटेराव यांनी माझ्याकडुन एकुण 1000/- रुपये लाच रक्कम सुर्ली ता.कोरेगाव जि.सातारा येथे स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

**13.**

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** sachin vitthal kandge (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sachin vitthal kandge

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1993 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**